<u>विशेष खटला क्र.१२२/२०२५ मधील नि.क्र.२७ वरील आदेश</u>

(CNR NO.MHPU14-001422-2025)

(पारीत दिनांक – २५.०२.२०२६)

१. अर्ज व त्यावरील विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे ऐकले.

२. मुळ फिर्यादीने अर्ज – नि.१३ ची प्रमाणीत प्रत तसेच अर्ज – नि.१८ वरील आदेशाची प्रमाणीत प्रत मागितली आहे. तसेच सदर अर्जाची मराठी अनुवादाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत, सदर अनुवादाची प्रत मिळेपावेतो सुनावणी स्थगीत करण्याची व म्हणणे देण्याकरीता मुदत देण्याची विनंती केली.

३. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी ते मुळ फिर्यादीस जामीन अर्ज मराठी भाषेत अनुवाद करुन सांगण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. तसेच प्रमाणित प्रती मिळण्याकरीता फिर्यादीने संबंधित विभागाकडे अर्ज व त्या अनुशंगाने आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जामीन अर्ज तात्काळ निकाली काढणे आवश्यक असल्याने तसेच फिर्यादीस जामीन अर्जावर लेखी म्हणणे सादर करण्याकरीता योग्य ती मुदत ब–याच वेळा देण्यात आलेली असल्याने त्याचप्रमाणे मागील तारखेस अर्ज – नि.१३ वर फिर्यादी यांच्या विरुध्द विना म्हणणे असा आदेश करण्यात आला असल्याने प्रकरणाची जामीन अर्जावरील सुनावणी स्थगित करणे न्यायोचित दिसून येत नाही. अशा परिस्थितीत, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. मुळ फिर्यादी यांनी त्यांना हव्या असलेल्या प्रमाणीत प्रतींबाबत संबंधित विभागाकडे आवश्यक तो अर्ज नियमानुसार सादर करावा व त्या विभागाकडून प्रस्तुत प्रकरणातील आवश्यक त्या प्रमाणित प्रती प्राप्त करुन घ्याव्यात.

२. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी मुळ फिर्यादी यांना प्रस्तुत प्रकरणातील अर्जाचा मराठी अनुवाद समजावून सांगावा अथवा मराठी अनुवाद करुन देण्याबाबत आवश्यक ती मदत करावी.

३. प्रकरणाची सुनावणी स्थगीत करण्याची विनंती नामंजूर करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.02.27 10:21:09 +0530

(**हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी**)

दिनांक – २५.०२.२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बारामती.